स्थापना 2005

अनामप्रेम

# ANAMPREM

# ANNUAL REPORT 2023




www anamprem.org



# अध्यक्षांचे मनोगत -

WWW.ANAMPREM.ORG

# सक्षमतेकडे वाटचाल – स्वावलंबी दिव्यांग घडविण्याचा निर्धार

दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर संधी, सन्मान आणि स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळावा या ठाम विचारातून अनामप्रेम संस्थेची वाटचाल सुरू आहे. सन २०२३ हे वर्ष संस्थेसाठी सेवाव्रत, संघर्ष आणि सकारात्मक परिवर्तन घडविणारे ठरले.

समाजातील दाते, हितचिंतक, स्वयंसेवक आणि शासन यांच्या सहकार्यामुळे आम्ही अनेक महत्त्वपूर्ण टप्पे पार करू शकलो, याचा आम्हाला अभिमान आहे.

आरोग्य व पुनर्वसनातील यश -

संस्थेतील अस्थिव्यंग गटातील गणेश गुंड, प्रशांत वनवे सह एकूण ४ लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या. त्यांच्या आरोग्य सुधारणा प्रक्रियेमुळे त्यांना नवसंजीवनी मिळाली असून, स्वावलंबनाकडे वाटचाल करण्याचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला आहे. तसेच आधार ग्राम  येथील स्पायनल  कॉर्ड  इंज्युरी रिहॅब  सेंटर च्या 14 पेशंट जे  त्यांच्या  नातेवाईकांनी  झोळीत  घालून आणले होते ते वॉकर वर व काही चालत त्यांच्या  घरी गेले ही मोठी उपलब्धी आहे... हे यश आपलयासाठी प्रेरणादायी आहे.

रोजगाराभिमुख उपक्रमांची भक्कम पायाभरणी -

दिव्यांग युवक-युवतींना शिक्षणासोबत रोजगाराची संधी मिळणे अत्यावश्यक आहे, या जाणिवेतून संस्थेने रोजगारनिर्मितीवर विशेष भर दिला. अनामप्रेम संस्था व Youth4Jobs यांच्या संयुक्त सहकार्याने 1800 दिव्यांग युवक-युवतींना विविध कंपन्यांमध्ये, मॉलमध्ये सह इतर खाजगी क्षेत्रात नोकरीच्या प्रवाहात आणण्यात यश आले. हा उपक्रम दिव्यांग सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

तसेच रोजगार निर्मितीच्या उद्देशाने संस्थेने ‘साथी उद्योग’ हा अभिनव उपक्रम सुरू आहे. या माध्यमातून दिव्यांग युवक-युवतींना उत्पादन, पॅकेजिंग, हस्तकला व लघुउद्योग क्षेत्रात प्रशिक्षण देऊन स्वकमाईची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

" शिका आणि कमवा" हा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

शिक्षण व विस्तार – मराठवाडा प्रकल्पाची सुरुवात

दिव्यांगांच्या शिक्षण व स्वावलंबनासाठी संस्थेने मराठवाडा विभागात नवा प्रकल्प सुरू केला आहे. या वर्षी औरंगाबाद येथे अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पा चा शुभारंभ करण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण व उपेक्षित भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

सामाजिक विश्वास आणि पुढील दिशा संस्थेची प्रत्येक वाटचाल ही समाजाच्या विश्वासावर आधारलेली आहे. दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि रोजगारनिर्मिती या चार स्तंभांवर संस्थेने कार्य सुरू ठेवले आहे.

सन २०२३ मध्ये घातलेली ही भक्कम पायाभरणी भविष्यातील अधिक व्यापक आणि शाश्वत विकासासाठी दिशादर्शक ठरेल, असा आमचा विश्वास आहे. अनामप्रेमची वाटचाल ही दानाधिष्ठित नव्हे तर स्वाभिमान आणि स्वावलंबनाधिष्ठित समाजनिर्मितीकडेच राहील.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने दिव्यांग बांधवांना सक्षम, आत्मविश्वासू आणि स्वावलंबी बनविण्याचा आमचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.

# अनामप्रेम



## ध्येयदृष्टी

दिव्यांग व्यक्ती आणि बालकांना शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक कौशल्ये व सामाजिक समानतेच्या संधी उपलब्ध करून देत, त्यांच्या आत्मविश्वास, सन्मान आणि स्वावलंबनाला बळकटी देणारी समृद्ध व शाश्वत सामाजिक-आर्थिक प्रणाली निर्माण करणे आणि समर्थ जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी अनामप्रेमची कटिबद्धता.

## कार्यउद्देश

दिव्यांग व्यक्ती व बालकांसाठी शिक्षण, आरोग्यसेवा, पुनर्वसन, कौशल्यविकास, समुपदेशन व सामाजिक समावेशनाच्या गुणवत्तापूर्ण आणि सुलभ सेवांचे जाळे उभारणे; समुदाय, तज्ञ संस्था व शासन यांच्या सहकार्याने टिकाऊ उपक्रम विकसित करणे; आणि प्रत्येक लाभार्थ्याच्या क्षमतांची वाढ करून त्यांना स्वावलंबन, सन्मान आणि सक्रिय सामाजिक सहभागासाठी मार्गदर्शन करणे.



# रक्षाबंधनातून जपली आपुलकी व सामाजिक एकात्मता




अनामप्रेम संस्थेच्या दोन्ही प्रकल्पांमध्ये रक्षाबंधन सण आपुलकी, प्रेम आणि सामाजिक एकात्मतेच्या भावनेतून उत्साहात साजरा करण्यात आला. या सणाच्या निमित्ताने दिव्यांग बांधवांसोबत स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा सुंदर उपक्रम राबविण्यात आला.

सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे रेणावीकर शाळेतील शिक्षक व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी भेट देऊन दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत आनंदाने वेळ घालवला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थितांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरले. या कार्यक्रमातून दिव्यांग व सामान्य विद्यार्थी यांच्यात स्नेह, संवाद आणि समावेशकतेचा संदेश देण्यात आला.

तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP), अहमदनगर यांच्या वतीने दिव्यांगांसाठी विशेष रक्षाबंधन उपक्रम आयोजित करण्यात आला. भगिनींनी प्रेमपूर्वक दिव्यांग बांधवांना राख्या बांधून त्यांच्याप्रती सन्मान, सुरक्षितता आणि आत्मीयतेची भावना व्यक्त केली. या उपक्रमामुळे दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे भाव उमटले.

अनामप्रेम संस्था अशा सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा आणि स्नेह, समानता व मानवतेचे मूल्य जपण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे. रक्षाबंधनाचा हा सण दिव्यांग आणि समाज यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ करणारा ठरला.








# वैद्यकीय सेवेतून नवजीवनाकडे : अनामप्रेममधील दिव्यांगांच्या जीवनात आशेचा नवा प्रकाश





अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग गणेश गुंड व प्रशांत वनवे यांच्या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे त्यांच्या अस्थिव्यंगत्वामध्ये मोठ्या प्रमाणात सौम्यता आली असून, त्यांच्या जीवनात नव्या आशेचा किरण निर्माण झाला आहे.

Indian Medical Association – अहमदनगर यांच्या पुढाकाराने व तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने ही महत्त्वपूर्ण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. शस्त्रक्रियेनंतर दोघांचेही हात सरळ झाले असून, बोटांची हालचाल सुरू झाल्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजात लक्षणीय सुधारणा दिसून येत आहे. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला असून स्वावलंबनाच्या दिशेने त्यांची वाटचाल अधिक सुलभ झाली आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातून आलेल्या या दोघांच्या पालकांनी या उपचारांबाबत मनापासून समाधान व कृतज्ञता व्यक्त केली आहे. उपचारांमुळे केवळ शारीरिक बदलच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबीयांच्या मनातील काळजीही मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

दिव्यांग व्यक्तींचे अपंगत्व कमी होऊन त्यांचे जीवनमान उंचावावे, त्यांना आत्मसन्मानाने व सक्षमपणे जीवन जगता यावे या उद्देशाने अनामप्रेम संस्था सातत्याने वैद्यकीय, शैक्षणिक, प्रशिक्षण व पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत आहे. गणेश आणि प्रशांत यांचे यशस्वी उपचार हे अनामप्रेमच्या या सेवाभावी कार्याचेच एक सशक्त उदाहरण आहे.

# अनामप्रेम - युथ फॉर जॉब मार्फत दिव्यांग युवकांच्या रोजगार स्वप्नांना नवे पंख








अनामप्रेम संस्थेच्या “युथ फॉर जॉब” नोकरी प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षित झालेले 36 मूकबधिर व अस्थिव्यंग दिव्यांग युवक–युवती हे बारामती (जि. पुणे) येथील Ferrero India Pvt. Limited या नामांकित कंपनीत यशस्वीरित्या नोकरीस रुजू झाले आहेत. हा क्षण केवळ या युवक–युवतींसाठीच नव्हे, तर दिव्यांगांच्या सन्मानपूर्वक रोजगाराच्या दिशेने काम करणाऱ्या अनामप्रेम संस्थेसाठीही अत्यंत अभिमानाचा आहे.

दिव्यांग व्यक्तींना स्वाभिमानाने स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळावे या उद्देशाने अनामप्रेम संस्था “कमावते व्हा” या अभियानांतर्गत सातत्याने कार्यरत आहे. या अभियानाच्या माध्यमातून केवळ कौशल्य प्रशिक्षणच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, कामाच्या ठिकाणी जुळवून घेण्याचे मार्गदर्शन तसेच रोजगारानंतर आवश्यक असणारे समुपदेशनही दिले जाते.

गेल्या 17 वर्षांपासून शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार व पुनर्वसन या क्षेत्रात कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेने दिव्यांगांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. “युथ फॉर जॉब” प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून आजपर्यंत 2200 पेक्षा अधिक दिव्यांग युवक–युवतींना खाजगी उद्योग क्षेत्रात सन्मानपूर्वक रोजगार मिळवून देण्यात आला आहे, ही बाब संस्थेच्या कार्याची विश्वासार्हता व परिणामकारकता अधोरेखित करते.

आज Ferrero India Pvt. Limited मध्ये नोकरीस रुजू झालेले हे 36 युवक–युवती स्वावलंबन, आत्मविश्वास व कर्तृत्वाचे प्रतीक बनले असून, त्यांच्या यशामुळे इतर दिव्यांगांसाठीही प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे. अनामप्रेम संस्थेचा हा प्रवास पुढेही असाच समाजघटकांना सक्षम करणारा व आशेचा किरण ठरणारा राहो, हीच अपेक्षा.

# दिव्यांगांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा निंबळक येथील स्वातंत्र्यदिन सोहळा




निंबळक येथील अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात स्वातंत्र्यदिनाचा ध्वजारोहण सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी डॉ. चेतना बहुरूपी यांनी, दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी अनामप्रेमसारख्या संस्थांचे कार्य महत्त्वाचे असून हा स्वातंत्र्यदिन दिव्यांगांना आत्मविश्वास देणारा असल्याचे मत व्यक्त केले. संस्थेतील सुमारे २०० दिव्यांगांनी एकत्र येऊन झेंडावंदन केले. अंध व अस्थिव्यंग गटातील विद्यार्थ्यांचे गुणदर्शन कार्यक्रम आणि मूकबधिर विद्यार्थ्यांची भाषणे विशेष लक्षवेधी ठरली. निंबळक शिवारात पहिल्यांदाच झालेल्या या ध्वजारोहणामुळे सर्व दिव्यांग गटात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# अनामप्रेमने दिली दिव्यांगांना रोजगाराची संधी



अनामप्रेम संस्थेच्या वतीने बेरोजगार दिव्यांगांसाठी रोजगारनिर्मितीच्या उद्देशाने ‘साथी उद्योग’ हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामध्ये शेतीपूरक व स्वयंरोजगारावर विशेष भर देण्यात येत असून, दिव्यांग व्यक्तींना प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून त्यांना स्थिर रोजगार मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

# यौन शोषित मूक, बेगुनाह संतति को मिला जीवनदान

## अनामप्रेम-स्नेहांकुर संस्था की सराहनीय समाज सेवा, 300 दिव्यांगों का किया जा रहा पालन-पोषण

लोकमत समाचार सेवा

**अहमदनगर:** अनमाप्रेम-स्नेहांकुर संस्था ने दुष्कर्म से गर्भवती हुई मूक पीड़िता का गर्भावस्था में 7 महीने ख्याल रखा. सफल प्रसूति करवाई और आत्मघात का मन बना चुकी महिला व उसकी संतति को जीवनदान दिया. इतना ही नहीं, उस अनचाही संतान को कानूनी तौर पर गोद लेकर महिला व उसके परिवार को समाज में बदनामी की फांसी चढ़ने से भी बचाया. यह सच्चाई एक गरीब लड़की नूर (बदला हुआ नाम) की है, जिसने अपने भाई-बहनों के लिए एक मां की भूमिका अदा की. उसके गूंगेपन का फायदा उठाकर एक दरिंदे ने उसे अपनी हवस का शिकार बनाया और उसके लिए आत्महत्या ही एक-मात्र विकल्प छोड़ा.

प्राप्त जानकारी के अनुसार, नूर के पिता निजी कंपनी में छोटे कर्मचारी हैं. मां बचपन में ही चल बसी. उसका 6 बहनों और 1 भाई वाला एक बड़ा परिवार था. मां की मृत्यु के बाद भाई-बहनों में सबसे बड़ी होने के नाते नूर पर घर की जिम्मेदारी थी. समय के साथ सभी सामान्य बहनों की शादी हो गई. पिता ने छोटे भाई को गांव से बाहर पढ़ने भेज दिया.

नूर और उसके पिता शहर के पास एक गांव में रहने लगे. पिता भी अक्सर घर से बाहर रहते. पिता की अनुपस्थिति में कई बार नूर को घर पर अकेली रहना पड़ता. ऐसे ही एक रात उसके गूंगेपन का फायदा उठाकर एक दरिंदे ने नूर को अपनी हवस का शिकार बना डाला. इस हादसे से वह टूट गई. अगले कुछ महीनों तक वह घर से बाहर ही नहीं निकली.

**खबर सुनते ही टूट गया बाप, अनामप्रेम ने संभाला:** इस बीच, पेटदर्द से अक्सर परेशान रहने वाली नूर के पिता अब तक उसके साथ हुए हादसे से अनभिज्ञ थे. पिता ने कई घरेलू उपचार आजमाए. अंततः उसे अस्पताल ले जाना पड़ा. वहां चिकित्सक ने नूर के 3 माह की गर्भवती होने की बात बताई. इस पर पिता भी टूट गए और मन में विचारों का सैलाब उमड़ पड़ा. तंगहाली से गुजर रहे बाप को कुछ समझ नहीं आया.

इसी बीच, जीने की आस छोड़ चुके बाप-बेटी को डॉक्टर ने स्नेहांकुर के बारे में बताया. दोनों गांव से 300 किमी दूर स्नेहांकुर पहुंचे. उनकी तकलीफ सुन स्नेहांकुर ने उन्हें 'अनामप्रेम' में भेजने का फैसला लिया. अनामप्रेम में उन्हें आसरा मिला. संस्था की डॉ मेघना मराठे, अभय रायकवाड़, विक्रम प्रभु, उमेश पंडुरे और विष्णु वारकरी ने टूटे हुए पिता की हिम्मत बंधाई. उन्हें बताया कि, 'वेदना से रिश्ता' ही संस्था का धर्म है और नूर को 7 महीनों के लिए गोद लिया.

**स्नेहांकुर ने अनचाही संतति को गोद लिया:** समय बीता और अनामप्रेम में नूर का हर तरह से ध्यान रखा गया. हाल ही में उसकी प्रसूति हुई. अनचाही संतति को स्नेहांकुर ने कानूनी रूप से अपने आश्रय में ले लिया. जैसे सीने से कोई बड़ा पत्थर हट गया हो. बाप-बेटी की रुलाई फूट पड़ी. आज दोनों बाप-बेटी बदनामी से दूर सामान्य जीवन जी रहे हैं. गौरतलब है कि, अनामप्रेम केवल सामाजिक समर्थन से संचालित संस्था है, जिसमें वर्तमान में 300 दिव्यांग, प्रताड़ित, कानूनी उलझनों से जूझ रहीं महिलाएं और लड़कियां आसरा पाए हुए हैं. इनकी मदद के लिए 9011020174, 7350013801, 9011670123 या 7350013806 पर अथवा jitbkul@gmail.com पर संपर्क किया जा सकता है.

# माणुसकी जिवंत आहे... अनामप्रेममुळे..!

यौन शोषणातून पीडित झालेल्या मुकबधिर महिलेने ज्या निरागस बाळाला जन्म दिला, त्या बेगुनाही मुलाला जीवनदान देण्याचे महान कार्य स्नेहांकुर संस्थेने केले आहे.

समाजाने नाकारलेल्या, अपमान व वेदना सहन करणाऱ्या आई व बाळाला आधार, संरक्षण, कायदेशीर मदत आणि प्रेमळ स्वीकार देत अनामप्रेमने पुन्हा एकदा माणुसकीचे दर्शन घडवले. आज ती आई आणि तिचे बाळ सुरक्षित, सन्मानाने व आत्मविश्वासाने जीवन जगत आहेत.

सध्या अनामप्रेम संस्था सुमारे ३०० दिव्यांगांचे पालन–पोषण, शिक्षण, पुनर्वसन व संरक्षण करत असून, दुर्लक्षितांच्या जीवनात आशेचा प्रकाश बनत आहे.






# पांढरी काठी दिन - जनजागृती रॅली

१५ ऑक्टोबर २०२३ रोजी अनामप्रेम संस्थेच्या वतीने जागतिक पांढरी काठी दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त अहमदनगर शहरात अंध-दिव्यांगांसाठी पांढऱ्या काठीचे महत्त्व अधोरेखित करणारी जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली.



# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सहभागातून दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा

अनामप्रेम – सत्यमेव जयते ग्राम, निंबळक येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून दहीहंडी कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थ्यांसह लहान विद्यार्थ्यांनीही विविध स्पर्धांमध्ये आनंदाने सहभाग घेतला व सणाचा आनंद द्विगुणीत केला. अशा सण-समारंभांमधून दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये आनंद, सक्रिय सहभाग तसेच सामाजिक समावेशाची भावना अधिक दृढ होत आहे.

# कौशल्यातून साकारलेली दिवाळी



दिवाळीनिमित्त अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी, विशेषतः मूकबधिर गटातील मुला-मुलींनी, आपल्या कौशल्याच्या जोरावर आकर्षक पणत्या व विविध सजावट साहित्य तयार केले. या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी नियोजन, मेहनत व टीमवर्कच्या माध्यमातून सहभाग घेतला. तयार करण्यात आलेले साहित्य पर्यावरणपूरक व कलात्मक स्वरूपाचे होते.




# दिव्यांगांसोबत बैलपोळा सण उत्साहात साजरा

अनामप्रेम – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात दिव्यांगांसोबत पारंपरिक बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमात रेणाविकर विद्या मंदिर व पेमराज सारडा महाविद्यालयातील शिक्षक तसेच मित्रपरिवार यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमात गोशाळेतील गायींची तसेच प्रकल्पातील वाहनांची विधिवत पूजा करण्यात आली.

यावेळी संस्थेत कार्यरत महिलांचा साडी, गजरे व मेहंदी कोन देऊन सन्मान करण्यात आला. अशा सण-उत्सवांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना आनंद, सामाजिक सहभाग व आत्मीयतेची भावना मिळावी, यासाठी अनामप्रेम संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे.





# दिव्यांगांच्या शिक्षण व स्वावलंबनासाठी आशेचा नवा अध्याय
# अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पाचे शुभारंभ

दिव्यांगांच्या उच्च शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनाच्या उद्देशाने अनामप्रेम संस्थेच्या मराठवाडा दिव्यांग शिक्षण सेवा प्रकल्पाचा शुभारंभ दिनांक २४ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत प्रारंभी २५ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी निवासी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, त्यांना मोफत निवास, भोजन, व्यक्तिमत्त्व विकास तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यात येत आहे.

हा प्रकल्प मराठवाड्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी केवळ शिक्षणाचा मार्गच नव्हे, तर स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सन्मानाने जगण्याची नवी संधी निर्माण करणारा ठरत आहे. समाजातील प्रत्येक घटकाला बरोबर घेऊन दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी अनामप्रेम संस्था सातत्याने कार्यरत आहे.

# दिव्यांगांची आनंदी दिवाळी अभियान - २०२३




अनामप्रेम संस्थेच्या वतीने दिव्यांगांची आनंदी दिवाळी अभियान – २०२३ अंतर्गत दिनांक ६ नोव्हेंबर २०२३ रोजी नोबल हॉस्पिटल, अहमदनगर येथे ३०० हून अधिक दिव्यांगांना दिवाळी निमित्त किराणा किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून एकूण ४०० दिव्यांग लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचविण्यात आली. गेल्या १० वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणारा हा उपक्रम दिव्यांगांच्या सणातील आनंदात सहभागी होण्याची अनामप्रेम संस्थेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करतो.



# दिव्यांग पुनर्वसन कार्यास माननीय ना. बच्चू कडू यांचे प्रोत्साहन व कौतुक




अनामप्रेम संस्थेच्या दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील कार्यास माननीय ना. बच्चू कडू साहेब यांचे स्थापनेपासून सातत्याने मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे. शासन दिव्यांगांच्या दारी या उपक्रमांतर्गत आयोजित अहमदनगर जिल्हा दौऱ्यात अनामप्रेम संस्थेचे सुमारे ७० स्वयंसेवक सक्रिय सहभागी झाले होते. या उपक्रमात सुमारे ३,००० दिव्यांग बांधवांना विविध सेवा व मदत उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अनामप्रेम संस्थेच्या संपूर्ण टीमने मोलाचे योगदान दिले.
यावेळी माननीय ना. बच्चू कडू साहेबांनी संस्थेच्या कार्याची सविस्तर माहिती घेऊन दिव्यांग पुनर्वसन क्षेत्रातील उपक्रमांचे विशेष कौतुक केले तसेच अनामप्रेम संस्थेसाठी शाळा व कर्मशाळा (वर्कशॉप) मंजूर करण्याचे आश्वासन दिले.

# अनामप्रेमचे मार्गदर्शक

श्री. सुवालालजी शिंगवी
सी.ए. सतीश सोमण
सौ. वैशाली चेके
श्री. बाळासाहेब भोरे
डॉ. सुवर्णा गणवीर
श्री. अविनाश मुंडके
श्री. यशवंत कुरापट्टी

श्री. संजय गुगळे
श्री. मिलिंद कुलकर्णी
सौ. शीला संचेती
सौ. मिना बेदरकर
डॉ. मार्सिया वॉरन
श्री. दीपक बुरम
श्री. अमित डोईफोडे

श्री. राजीव सिंग
श्री. दिपक देशपांडे
सौ. अनिता माने
श्री. अजित बेदरकर
डॉ. अभिजीत बोरुडे
श्री. उमेश पंडुरे
श्री. फिरोज तांबटकर

सौ. ज्योती एकबोटे
श्री. राजीव गुजर
डॉ. हेमंत देशपांडे
श्री. किशोर कुलकर्णी
डॉ. चेतना बहुरूपी
प्रा. प्रमोद तांबे
श्री. शशिकांत सातभाई

# अनामप्रेमचे सेवाव्रती


अभय रायकवाड


विष्णु वारकरी



रामदास काकडे


विक्रम प्रभु


प्रविण नवले


भारती सोनवणे


राहुल खिरोडे


सुनिल कांबळे


सुरेखा राठोड


सुरेखा कोतकर


माधवी सैंदाणे


रामु बांडेबुचे


राजु भगत


अमृत भुसारी


प्रकाश गजे



शुभांगी वारकरी


मनोज दंडीमे


बद्रिनाथ कुटे


पोपट लोंढे


पल्लवी मकासरे


अक्षयकुमार राऊत



शिवानंद राऊत


शिवलाल पाल


मुंजाजी गालफडे


संतोष फुलसौंदर


सचिन गारदे


विद्या रानवडे


रोहित लाटणे

The Bombay Public Trust Act, 1950
Schedule IX [Vide Rule 17 (1)]

Name of the Public Trust : Anamprem

Registration No : MAH/065/06/AHMEDNAGAR; AF9992

**Income and Expenditure Account for the year ended**

| Expenditure | 31-Mar-2023 Amount (Rs) | 31-Mar-2023 Amount (Rs) | Income | 31-Mar-2023 Amount (Rs) | 31-Mar-2023 Amount (Rs) |
|---|---|---|---|---|---|
| ***Expenditure in respect of properties*** | | | ***Interest*** | | |
| Rates & Taxes | 6,99,352 | | Realised | | |
| Repairs & Maintenance | 12,97,042 | | On Bank Account | | 2,235 |
| Other expenses | - | 19,96,394 | On Deposits | | 3,22,781 |
| | | | Other | | - |
| ***Establishment Expenses*** | | | Accrued | | |
| | | | On Deposits | | - |
| Audit Fees | 25,000 | | | | |
| Depreciation | - | | **Donation Received** | | 1,70,89,960 |
| Legal Expenses | - | 25,000 | | | |
| | | | **Other Income** | | 4,47,059 |
| ***Expenditure on object of the Trust*** | | | | | |
| Educational | 2,89,260 | | | | |
| Medical Relief | 2,55,771 | | | | |
| Animal Welfare Expenses | 6,13,277 | | | | |
| Any other object of general public utility | 10,22,908 | | | | |
| Relief of poor | 3,51,792 | | | | |
| Others | 66,32,025 | | | | |
| Promotion of Sports | - | | | | |
| Promotion of Art | - | | | | |
| Donation to another trust | - | 91,65,033 | | | |
| Surplus carried to Balance Sheet | | 66,75,608 | | | |
| **Total** | | **1,78,62,035** | **Total** | | **1,78,62,035** |

As per our report of even date
Sukrut Dewarde & Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 153539W

Sukrut Dewarde
Membership No. 170109
Place: Pune
Date: 29th September 2023
UDIN : 23170109BGXIBM7527

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and / Assets of the Trust.

For Anamprem

| Trustee | Trustee |
|---|---|
| Place: Ahmednagar | Place: Ahmednagar |
| Date: 29th September 2023 | Date: 29th September 2023 |

ANAMPREM TRUST NO. 065/2006 REG. NO. F-9992 AHMEDNAGAR

Sukrut Dewarde & Associates FRN 153539W Chartered Accountants, Pune

# आर्थिक अहवाल -



The Bombay Trust Act, 1950
Schedule VIII [vide Rule 17(1)]

Name of the Public Trust : Anamprem

Registration No : MAH/065/06/AHMEDNAGAR; AF9992

Balance Sheet as at

| Funds and Liabilities | 31-Mar-2023 Amounts (Rs) | 31-Mar-2023 Amounts (Rs) | Property and Assets | 31-Mar-2023 Amounts (Rs) | 31-Mar-2023 Amounts (Rs) |
|---|---|---|---|---|---|
| *Trusts Fund or Corpus* | | | *Property, Plant and Equipment* | | 4,75,53,275 |
| Balance as per last Balance Sheet | 16,70,748 | | As per schedule attached | | |
| Add: Utilisation | | | | | |
| Add: Donation recived towards Corpus | - | 16,70,748 | | | |
| *Other Earmarked Funds* | | | *Investments* | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,96,54,610 | | As per schedule attached | | 80,00,000 |
| Add : Donation Received | - | | | | |
| Add : Transfer from I & E Account | - | | (The market value of the above Investments Rs. 80,00,000) | | |
| | 3,96,54,610 | | | | |
| Less : Utilisation Tr to I & E Account | - | | | | |
| Less : Utilisation Tr to Corpus Fund | - | 3,96,54,610 | | | |
| *Liabilities* | | | *Current Assets* | | |
| For Expenses | 13,81,801 | | Advances & Loans | 92,433 | |
| TDS Payable | 1,346 | | Tax deducted as source & refunds | 56,646 | |
| Salary Payable | 1,79,865 | | **Bank Balance** | | |
| Profession Tax Payable | 2,400 | | In saving | - | |
| Advances | - | 15,65,412 | In current | 11,05,280 | |
| | | | **Cash in Hand** | 22,696 | 12,77,055 |
| *Income & Expenditure Account* | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 72,63,952 | | | | |
| Add : Surplus / (Deficit) as per I & E Account | 66,75,608 | | | | |
| Add : Prior year adjustments | - | | | | |
| Add : Transfer from other Earmarked Funds | - | | | | |
| Less : Transfer to other Earmarked Funds | - | 1,39,39,560 | | | |
| | | **5,68,30,330** | | | **5,68,30,330** |

As per our report of even date
Sukrut Dewarde & Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 153539W

Sukrut Dewarde
Membership No. 170109
Place: Pune
Date: 29th September 2023
UDIN : 23170109BGXIBM7527

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and / Assets of the Trust.

For Anamprem


Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2023

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2023

ANAMPREM TRUST NO. 065/2006 REG. NO. F-9992 AHMEDNAGAR

Sukrut Dewarde & Associates FRN 153539W Chartered Accountants, Pune

# अनामप्रेम - वस्तीगृहनीहाय विद्यार्थी संख्या














| Bank Name | State Bank Of India |
| --- | --- |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ), Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.